ग्राम पंचायत सदस्य व सरपंचांना जात वैधता प्रमाणपत्र दाखल करण्यास एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा शासनाचा निर्णय

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याचे यश

10 मे रोजी शासन निर्णय निर्गमित

कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे राज्यातील १४००० ग्राम पंचायतींमधील राखीव प्रवर्गातील ग्राम पंचायत सरपंच तसेच सदस्य यांना विशेष बाब म्हणून जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास पुनःश्च एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. विधीमंडळ लोकलेखा समितीचे प्रमुख तथा माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी यासंदर्भात केलेल्या प्रयत्नांना यश प्राप्त झाले आहे. राज्य शासनाच्या ग्रामविकास विभगाचे दिनांक १० मे २०२२ रोजी याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला आहे.

आ. सुधीर मुनगंटीवार यांनी या मागणी संदर्भात राज्याचे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्याशी व जिल्हाधिका-यांशी सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा केला. दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्हाधिकारी श्री. अजय गुल्हाने यांची भेट घेत निवेदन देखील सादर केले. ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्याशी देखील त्यांनी चर्चा केली.राजुरा येथील माजी आमदार श्री सुदर्शन निमकर यांनी या मागणीकडे आ. सुधीर मुनगंटीवार यांचे लक्ष वेधले हे विशेष.

महाराष्ट्रासह चंद्रपूर जिल्हयात ग्राम पंचायतीच्या सार्वत्रीक निवडणुका जानेवारी २०२१ च्या दरम्यान घेण्यात आल्या होत्या. या निवडणुकांचा निकाल दिनांक १८ जानेवारी २०२१ रोजी घोषीत करण्यात आला. निवडणुका आटोपताच पुन्हा कोरोनाची दुसरी लाट राज्यात सुरू झाली. त्यामुळे शासनाने कोरोनाच्या प्रतिबंधाकरिता पुन्हा कडक निर्बंध लागू केले. या कडक निर्बंधामुळे शासकीय कार्यालये बंद होती व दळणवळणाची साधने सुध्दा लॉकडाऊनमुळे बंद होती. या कालावधीत चंद्रपूर जिल्हयात कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे १५६७ व्यक्ती मरण पावल्यामुळे भितीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे ग्राम पंचायत सदस्यांना शासकीय कार्यालयातुन जात वैधता प्रमाणपत्राकरिता लागणारे पुरावे वेळेत मिळू न शकल्यामुळे एक वर्षाच्या मुदतीत ब-याच ग्राम पंचायत सदस्यांना जात वैधता प्रमाणपत्र दाखल करता आले नाही. तसेच काही ग्राम पंचायत सदस्यांनी जात वैधता प्रमाणपत्र उशीरा दाखल केले असता या सदस्यांना सुध्दा अपात्र करण्याबाबतच्या नोटीस जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आल्या.ग्राम पंचायत सदस्यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेल्या केसेस जात वैधता समितीकडे प्रलंबित असतांना तसेच काही सदस्यांनी मुदतीच्या नंतर जात वैधता प्रमाणपत्र दाखल केले असतांना अशा जवळपास १०४० च्या वर ग्राम पंचायत सदस्यांना अपात्र करण्याबाबतच्या नोटीस देण्यात आलेल्या आहेत. ग्राम पंचायत सदस्य हे जनतेमधून निवडून आलेले जनप्रतिनिधी आहे , यात प्रामुख्याने शेतकरी ,शेतमजूर , गरीब नागरिक आहेत .एवढया मोठया प्रमाणात सदस्यांना अपात्र केल्यास ग्राम पंचायतीच्या प्रशासनावर व पर्यायाने ग्रामविकासावर त्याचा विपरीत परिणाम होणार आहे विशेषतः त्यांच्या हक्कावर गदा येणार आहे.पुन्हा सार्वत्रीक निवडणुका घेणे सुध्दा प्रशासकीय दृष्टया हिताचे ठरणार नाही. त्यामुळे कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे राज्यातील तसेच चंद्रपूर जिल्हयातील ग्राम पंचायत सदस्यांना जात वैधता प्रमाणपत्र दाखल करण्यात एक वर्षाची मुदतवाढ देणे अत्यंत गरजेचे आहे अशी भूमिका आ. मुनगंटीवार यांनी शासन व प्रशासनाकडे मांडली व त्याचा पाठपुरावा केला.

आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या या प्रयत्नांना यश प्राप्त झाले असून राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने विशेष बाब म्हणून जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत पुनःश्च एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे राज्यातील सरपंच व ग्राम पंचायत सदस्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सत्यमेव जयते
**सुधीर स. मुनगंटीवार**
विधानसभा सदस्य
समिती प्रमुख - विधीमंडळ लोकलेखा समिती
तथा माजी कॅबिनेट मंत्री (महाराष्ट्र)

जा.क्र. ९७९०/मे ६६/२२
दिनांक : २.५.२०२२

स्मरणपत्र क्रमांक : ०१

प्रति,

मा. ना. हसनजी मुश्रीफ
ग्रामविकास मंत्री
महाराष्ट्र शासन, मंत्रालय
मुंबई —३२

सप्रेम नमस्कार,

विषय: कोविड—१९ च्या प्रादुर्भावामुळे चंद्रपूर जिल्हयातील ग्राम पंचायत निर्वाचित सदस्यांना जात वैधता प्रमाणपत्र दाखल करण्यास झालेला विलंब माफ करून १ वर्ष मुदतवाढ देण्याबाबत.

संदर्भ: माझे आपणास सादर पत्र दिनांक २७.४.२०२२

महोदय,

श्री. सुदर्शन निमकर, माजी आमदार, राजुरा जि. चंद्रपूर यांचेकडून प्राप्त निवेदन आपणाकडे संदर्भीय पत्रान्वये पाठविले आहे. महाराष्ट्रसह चंद्रपूर जिल्हयात ग्राम पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका जानेवारी २०२१ च्या दरम्यान घेण्यात आल्या होत्या. या निवडणुकांचा निकाल दिनांक १८ जानेवारी २०२१ रोजी घोषीत करण्यात आला. निवडणुक आटोपताच पुन्हा कोरोनाची दुसरी लाट राज्यात सुरू झाली. त्यामुळे शासनाने कोरोनाच्या प्रतिबंधाकरिता पुन्हा कडक निर्बंध लागु केले. या कडक निर्बंधामुळे शासकीय कार्यालये बंद होती व दळणवळणाची साधने सुध्दा लाकडाऊनमुळे बंद होती. या कालावधीत चंद्रपूर जिल्हयात कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे १५६७ व्यक्ती मरण पावल्यामुळे भितीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे ग्राम पंचायत सदस्यांना शासकीय कार्यालयातुन जात वैधता प्रमाणपत्राकरिता लागणारे पुरावे वेळेत मिळु न शकल्यामुळे एक वर्षाच्या मुदतीत बऱ्याच ग्राम पंचायत सदस्यांना जात वैधता प्रमाणपत्र दाखल करता आले नाही. तसेच काही ग्राम पंचायत सदस्यांनी जात वैधता प्रमाणपत्र उशीरा दाखल केले असता या सदस्यांना सुध्दा अपात्र करण्याबाबतच्या नोटीस जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आलेल्या आहेत.

ग्राम पंचायत सदस्यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेल्या केसेस जात वैधता समितीकडे प्रलंबित असतांना तसेच काही सदस्यांनी मुदतीच्या नंतर जात वैधता प्रमाणपत्र दाखल

...२



गोल बाजार वार्ड, चंद्रपूर (महाराष्ट्र), दूरध्वनी : 07172 - 252582, 258800 7722074199
Email : sudhirbhau.mungantiwar@gmail.com, bjp03069@gmail.com, Office Whatsapp 9552799608

सत्यमेव जयते
सुधीर स. मुनगंटीवार
विधानसभा सदस्य
समिती प्रमुख - विधीमंडळ लोकलेखा समिती
तथा माजी कॅबिनेट मंत्री (महाराष्ट्र)



केले असतांना अशा जवळपास १००० च्या वर ग्राम पंचायत सदस्यांना अपात्र करण्याबाबतच्या नोटीस देण्यात आलेल्या आहेत. ग्राम पंचायत सदस्य हे जनतेमधुन निवडून आलेले जनप्रतिनिधी असल्यामुळे एवढया मोठया प्रमाणात सदस्यांना अपात्र केल्यास ग्रामपंचायतीच्या प्रशासनावर विपरीत परिणाम होणार असुन पुन्हा सार्वत्रिक निवडणुका घेणे सुध्दा प्रशासकीय दृष्टया हिताचे ठरणार नाही.

त्यामुळे चंद्रपूर जिल्हयासह राज्यातील ग्राम पंचायत सदस्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता एक वर्षाची मुदतवाढ देण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. याबाबत शासनस्तरावरून न्यायोचित कार्यवाही होणे आवश्यक आहे.

कृपया आपण जातीने लक्ष घालुन याबाबत त्वरीत योग्य कार्यवाहीसाठी संबंधितांना आदेश द्यावेत, ही विनंती.

कार्यवाहीची रूपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

योग्य सहकार्याची अपेक्षा

सविनय धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

१ मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर

२ श्री. सुदर्शन निमकर, माजी आमदार, राजुरा जि. चंद्रपूर मो.नं.९८५०३००३०३

(130)

राज्यातील माहे २०२१ मध्ये पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये राखीव प्रवर्गातुन लढविणा-या उमेदवारांनी विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

शासन परीपत्रक क्रमांक: ग्रापंनि-२०२२/ प्र.क्र.६०/पं.रा.-२.
ग्राम विकास विभाग,
२५, बांधकाम भवन, मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दिनांक : १० मे, २०२२.

संदर्भ:- १. मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे दिनांक २८ एप्रिल, २०२२ रोजीचे पत्र.

२. सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४, दिनांक ११ मार्च, २०२०.

परिपत्रक :-

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १० च्या पोट-कलम (१क) आणि कलम ३०-१क मध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती, नागरिकांचा मागास प्रवर्ग यांच्याकरीता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणुक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरुन, सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत तरतूद आहे.

तथापि, जात पडताळणी समित्यांकडील कामाच्या भारामुळे केवळ वेळेत जात वैधता प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे, उमेदवारांना राखीव पदांसाठी निवडणूक लढविण्याच्या संधीपासून वंचित रहावे लागू नये यासाठी सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४, दिनांक ११ मार्च, २०२० अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १० च्या पोट-कलम (१क) आणि कलम ३०-१क सदस्य/सरपंच पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांकात <u>२८ फेब्रुवारी, २०२१</u> असा बदल करुन जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांची मुदत देण्यात आली होती.

Scanned with CamScanner

त्याअनुषंगाने माहे जानेवारी, २०२१ मध्ये झालेल्या निवडणूकांबाबत राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या उमेदवारांनी पडताळणी समितीकडून दिलेले जातीचे वैधता प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्यास सादर करण्याचा अंतिम दिनांक १७ जानेवारी, २०२२ असा होता.

माहे जानेवारी, २०२१ मध्ये राज्यातील सुमारे १४००० ग्रामपंचायतींच्या निवडणूका पार पाडण्यात आल्या होत्या. सदर निवडणूकांमध्ये मोठया प्रमाणावर राखीव प्रवर्गातून उमेदवार निवडून आले आहेत. सबब राज्यातील कोव्हीड-१९ च्या पार्श्वभुमीवरील निर्बंधामुळे विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध होवू शकले नाही. त्याअनुषंगाने मोठया प्रमाणावर राखीव प्रवर्गामधून निवडून आलेल्या सरपंच/सदस्य हे पदापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सबब उपरोक्त प्रकरणी राज्यातील सुमारे १४००० ग्रामपंचायतींमधील राखीव प्रवर्गातील ग्रामपंचायत सरपंच/सदस्य यांना **विशेष बाब म्हणून जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास पुनश्च एक वर्षाची मुदतवाढ देण्यात येत आहे.**

त्याअनुषंगाने केवळ माहे जानेवारी, २०२१ मध्ये झालेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणूकांबाबत राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या उमेदवारांनी पडताळणी समितीकडून दिलेले जातीचे वैधता प्रमाणपत्र सक्षम अधिकाऱ्यास सादर करण्याचा अंतिम **दिनांक १७ जानेवारी, २०२३** असा असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(मनोज जाधव)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई.
२. सर्व सन्मानीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्या.
३. राज्यपालांचे सचिव,
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
५. मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,
६. मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
७. मा.राज्य निवडणुक आयोग यांचे कार्यालय,
८. मा.मुख्यसचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
९. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
१०. मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी,
११. विभागीय आयुक्त, सर्व.

Scanned with CamScanner

१४. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), सर्व.

१५. सर्व मंत्रालयीन विभाग,

१६. विभागातील सर्व सहसचिव, उपसचिव,

१७. विभागातील सर्व कार्यासने,

१८. निवडनस्ती ( पं.रा.-२).

Scanned with CamScanner